N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.
1	इलेक्ट्रॉनिक सामान	मोबाईल फोन	एक ॲपल कंपनीचा आयफोन मोबाईल, सिल्वर रंगाचा, मॉडेल नं. 16 pro max, IMEI 1 351104517457813, IMEI	95,000.00
2	नगदी आणि चलन	भारतीय- रुपया	भारतीय चलनातील 500 रुपये दराच्या 20 नोटा क्रमांक 1 4HW029348 2 6EB186687 3 6EB186686 4 0EP	10,000.00
3	इतर	वेब-उपकरण/उपसाधन	एक काळ्या रंगाचा सनडीस्क कंपनीचा पेनड्राईव्ह, 32 जीबी क्षमतेचा	360.00

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):
105,360.00

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

S.No. (अ.क्र.)	UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत):

फिर्याद दिनांक:- 01/08/2025

मुख्तार उर्फ पप्पुभाई अब्दुल सत्तार शेख, वय 52 वर्षे, व्यवसाय - खासगी कॉन्ट्रक्टर, रा.ठी. - रूम नं. ई 801, कन्काकिया सेव्हन्स, मरोळ सागबाग, अंधेरी पुर्व, मुंबई 59. मो.क्र. 9769225586

मी वरील नमुद ठिकाणी सन 2022 पासुन माझे कुटुंबासह राहण्यास असुन मी बांधकाम दुरुस्ती तसेच इंटेरियरचे कामे करतो. माझे मुख्य कार्यालय - ऑफीस नं. 01, रोड नं. 02, ॲरो व्हिवु हौसिंग सोसायटी समोर, सहार व्हिलेज, चर्च पखाडी, मुंबई येथे आहे. सदर व्यवसायातून मिळणारे उत्पन्नावर मी माझा उदरनिर्वाह चालवितो.

आज रोजी मी समक्ष एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई येथे येवून इसम नामे कमलेश राय, व्यवसाय - माजी नगरसेवक तथा सामाजीक कार्यकर्ता याने माझे बांधकाम व्यवसायाशी संबंधीत कामाबाबत मुंबई मनपाचे संबंधीत अधिकारी यांच्याकडे तक्रारी करून मी करत असलेले बांधकाम हे अवैध व बेकायदेशीर आहे, असे सांगून ते थांबविण्याकरिता धमकावले व काम सुरळीत चालू ठेवायचे असेल तर त्यास मी काही रुपये खंडणीच्या स्वरूपात दयावेत अशी त्याने जुलमाने पैशांची मागणी केल्याची तक्रार मी समक्ष ठाणे अंमलदारांना कथन केल्याने सदरबाबत त्यांनी मा. वरिष्ठांना सांगितल्यावरुन त्यांच्या आदेशाने मी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे कक्षात पोनि महेश गुरव यांचे समक्ष सविस्तर हकीकत सांगतो तो पुढीलप्रमाणे -

मी सहार कार्गो, बि.नं. 119, सहार कार्गो रोड, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी नामे विक्रम शितोळे यांच्या व्यावसायीक गाळयाचे नुतनीकरण करण्याचे काम सुरू केले आहे. त्याबाबतची कायदेशीर पुर्तता करून मी सदर काम कॉन्ट्रक्ट पध्दतीने घेतले आहे. सदर काम हे बेकायदेशीर असल्याचे सांगून सदर कामाबाबत बृहन्मुंबई महानगरपालीका कडे तक्रार करून सदर काम बंद करण्याची मला माझ्या परिचयाचे इसम नामे कमलेश राय यांनी

धमकी दिली होती. सदर कामाचे तसेच माझे इतर ठिकाणी चालू असलेले बांधकाम तसेच नुतनीकरण सुरळीतपणे चालू ठेवायचे असेल तर एकूण 35,00,000/- रूपये द्यावे लागतील असे इसम नामे कमलेश राय यांनी मला धमकावले. इसम नामे कमलेश केदारनाथ राय हे माजी नगरसेवक व सामाजीक कार्यकर्ते असून ते मरोळ, सहार, एमआयडीसी हद्दीतील बांधकाम व्यावसायीक यांना बीएमसी तसेच इतर शासकीय कार्यालयाचे माध्यमातून काम थांबविण्याची धमकी देवून जुलमाने पैशांची मागणी करून खंडणी वसूल करत असतात.

दिनांक 03/07/2025 रोजी इसम नामे कमलेश केदारनाथ राय यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशी माझ्याकडे पैशाची मागणी केल्यावरून मी त्यांना 3,00,000/- रूपये हे त्यांचे मालकीचे हॉटेल गोल्डन टुलीप्स, प्राईम अँकडमी स्कुलच्या बाजुला, भवानी नगर, मिलेटरी रोड, मरोळ, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी दिले होते. त्याचप्रमाणे दिनांक 30/07/2025 रोजी रात्री 23.00 वा. च्या सुमारास कमलेश राय यांनी त्याचे राहते निवासस्थान 7 वा मजला, वसंत ओयासीस, मरोळ मकवाना रोड, अंधेरी पुर्व, मुंबई येथे मला बोलावून मला पुन्हा एकदा धमकावून 5,00,000/- रूपये हे माझ्याकडून जबरदस्तीने घेतले होते. सदरबाबत मी माझ्याकडील गुप्त कॅमे-यामध्ये रेकॉर्डिंग केले. सदर रेकॉर्डिंग मी एका पेनड्रायव्हमध्ये जतन केले आहे.

नामे कमलेश राय यांनी आज दिनांक 01/08/2025 रोजीचे शुक्रवारचे दुपारचे नमाज नंतर साधारण 14.00 वा. चे सुमारास मला त्यांचे नवीन कार्यालय - तळ मजला, वसंत ब्लॉसम, मरोळ मकवाना रोड, अंधेरी पुर्व, मुंबई या ठिकाणी आणखी 5,00,000/- रूपये घेवून बोलावले आहे. मला इसम नामे कमलेश राय यास आणखी पैसे देण्याची इच्छा नाही म्हणुन आज रोजी पोलीसांकडे तक्रार करण्यासाठी आलो असता माझ्या तक्रारीची शहानिशा करून सापळा कारवाई करणेबाबत मला समज देण्यात आली. त्याप्रमाणे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोनि महेश गुरव, सपोनि पालवे व पोलीस पथक यांना मी सर्व हकीकत थोडक्यात समजावुन सांगुन मी नामे कमलेश राय याच्यासोबत केलेल्या संभाषणाचा व्हिडीओ पोनि महेश गुरव यांना दाखविला व सदर व्हिडीओ जतन असलेला पेनड्रायव्ह सादर केला. पोनि महेश गुरव व पथक यांनी सदर व्हिडीओ पाहून आपण नामे कमलेश राय यास सापळा रचून ताब्यात घेवू असे सांगून नामे कमलेश राय हा सदर पैसे कोठे व कसे घेणार आहे? याबाबत मला त्यांच्याकडे विचारणा करण्यास सांगितले असता कमलेश राय यास मी पोलीस ठाण्यास उपस्थित पोलीस पथक व पंचा समक्ष कॉल करून विचारले असता त्यांनी खंडणीची रक्कम 5,00,000/- रूपये घेण्यासाठी त्यांचे नवीन कार्यालय - तळ मजला, वसंत ब्लॉसम, मरोळ मकवाना रोड, अंधेरी पुर्व, मुंबई येथे आज रोजी 15.00 वा. च्या सुमारास येण्यास सांगितले. त्यावरून सदर ठिकाणी सापळा रचुन माझेकडुन पैसे स्वीकारताना कमलेश राय यास रंगेहात पकडण्याची पोलीसांनी सापळा आखणी केली. त्यानंतर पोनि गुरव यांच्या सुचनेवरून मी भारतीय चलनातील 500/- रूपये दराच्या एकूण 20 नोटा असे एकूण 10,000/- रूपये सपोनि पालवे यांच्याकडे दिले. सपोनि पालवे यांनी सदर नोटांचे क्रमांक नोंदवून सदर नोटांचे वर व खाली लहान मुलांचे खेळण्यातील नोटा संशय येणार नाही अशा बेमालूमपणे मिसळून सदर बंडल हा रूपये 5,00,000/- चा भासेल असा हुबेहुब तयार केला व तो नामे कमलेश राय याच्याकडे देण्याकरीता एका पारदर्शक प्लॅस्टीकच्या कागदामध्ये गुंडाळून ते एका रंगीबेरंगी गोल ठिपके असणा-या प्लॅस्टीकचे पिशवीत ठेवुन ते माझ्याकडे दिले व पोनि महेश गुरव यांनी सर्व पोलीस पथक, उपस्थित पंच यांना छाप्याची एकंदर रूपरेशा समजावून सांगून छाप्याची सिद्धता करून माझ्या सोबत 14.50 वा. च्या सुमारास एमआयडीसी पोलीस ठाणे येथून कमलेश राय याचे नवीन कार्यालय - तळ मजला, वसंत ब्लॉसम, मरोळ मकवाना रोड, अंधेरी पुर्व, मुंबई येथे खाजगी वाहनाने रवाना झालो.

पोलीस ठाणे येथून रवाना झालेनंतर पोलीसांनी सांगितल्यावरून मी नामे कमलेष राय यांना कॉल करून त्यांच्या भेटीच्या निश्चितेबाबत खात्री केली असता त्यांनी ते त्यांच्या नमुद ऑफीसमध्येच असल्याचे सांगून सदर ठिकाणी मला भेटण्यास बोलावले. मी पोलीस पथक व पंचासह आसनस्थ खाजगी वाहनाने एमआयडीसी सेंट्रल रोडने उजवीकडे वळण घेवून विजयनगर ब्रीजकडे आलो व विजयनगर जंक्शन येथून उजवीकडे वळण घेवून आम्ही सेव्हनहिल्स हॉस्पिटल समोरून सिग्नलवरून डावीकडे वळण घेवून मरोळ मिलेटरी रोडने पुर्व दिशेस राज पॅराडाईस बिल्डींगजवळ आलो. राज पॅराडाईज बिल्डींग समोरून उजवीकडे वळण घेवून मरोळ मकवाना रोडने वसंत ब्लॉसम या नियोजित स्थळी जात असताना नामे कमलेष राय याने माझ्या मोबाईलवर कॉल करून त्याने सदर परिसरात असलेले त्याचे मालकीचे हॉटेल गोल्डन टुलीप्स, प्राईम अँकडमी स्कुलच्या बाजुला, भवानी नगर, मिलेटरी रोड, मरोळ, अंधेरी पुर्व, मुंबई याठिकाणी येण्यास सांगितले. भेटीचे बदललेल्या ठिकाणाबाबत पोनि गुरव यांनी फोनद्वारे इतर पथकास माहिती देवून गोल्डन टयुलीप्स हॉटेल येथे सापळा रचण्याबाबत सुचना केली. साधारण 15.10 वा.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

सोबत हॉटेलमध्ये येऊन इसम नामे कमलेश राय याची स्दर ठिकाणी वाट पाहत असता अंदाजे 15.15 वा. च्या सुमारास तो त्याच्या खाजगी वाहनाने नमुद हॉटेलमध्ये पोहचला.

पोनि गुरव यांनी सापळा रचुन उभ्या असलेल्या पोलीस पथकास सतर्कतेचा इशारा दिला व तरल्याप्रमाणे आज रोजीचे 15.15 वा. च्या सुमारास इसम नामे कमलेश राय हा माझ्याकडील 5,00,000/- रूपये भासतील असे पैशांचे बंडल स्विकारताना पोलीसांनी त्यास सापळा रचून रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोनि गुरव यांनी त्यास आपले ओळखपत्र दाखवून पोलीस असल्याचे सागून सोबत असलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदार तसेच पंचाची व माझी ओळख करुन दिली व त्यास प्राप्त तक्रारीबाबत थोडक्यात माहीती देवुन माझे व पंचासमक्ष त्याची ओळख विचारली असता त्याने त्याचे नाव कमलेश केदारनाथ राय, वय 52 वर्षे, धंदा-हॉटेल व्यवसाय, रा.ठी.- 702, बि.नं. 06, ईबोनी, वसंत ओयासीस, मरोळ मकवाना रोड, अंधेरी पुर्व, मुंबई, मो.क्र. 9820006067 असे सांगितले. त्यानंतर पोलीसांनी त्याच्याकडील 5,00,000/- रूपये भासतील असे पैशांचे बंडल तसेच त्याचा वापरता मोबाईल जप्त केला.

तरी दिनांक 03/07/2025 ते आज दिनांक 01/08/2025 रोजी 15.15 वा. पावेतो च्या कालावधीत इसम नामे कमलेश केदारनाथ राय, वय 52 वर्षे, धंदा-हॉटेल व्यवसाय, रा.ठी.- 702, बि.नं. 06, ईबोनी, वसंत ओयासीस, मरोळ मकवाना रोड, अंधेरी पुर्व, मुंबई याने मी करत असलेले बांधकाम हे अवैध व बेकायदेशीर आहे असे सांगून ते बाबविण्याकरिता धमकावले व काम सुरळीत चालू ठेवायचे असेल तर त्यास मी 35,00,000/- रुपये खंडणीच्या स्वरूपात द्यावेत अशी मागणी करून त्याने दिनांक 03/07/2025 रोजी रुपये 3,00,000/- तसेच दिनांक 30/07/2025 रोजी 5,00,000/- रूपये माझ्याकडून जुलमाने घेतले. तसेच तो आज दिनांक 01/08/2025 रोजी 15.15 वा. रूपये 5,00,000/- माझ्याकडून खंडणीच्या स्वरूपात मागणी करून ती स्विकारत असताना पोलीसां समक्ष रंगेहाथ मिळून आला. वास्तव माझी इसम नामे कमलेश केदारनाथ राय, वय 52 वर्षे याच्यादिरूद्ध रितसर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मला मराठीतुन वाचुन हिंदीतुन समजावुन सांगितली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
MAHESH PANDHARINATH GURAV
Rank (पद): I (Inspector) **No.**(क्र.):
to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):